## न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग भूम (न्यायालय क्र.२)

नि.फौज.खटला क्र.१०४/२०१९
शासन वि. भागवत
**निशानी क्र.१६**

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.०१ चा सरतपास सहा. सरकारी अभियोक्ता श्री.जे.जे.सरवदे यांचे मार्फत शपथेवर सुरु –**

| | | |
|---|---|---|
| माझे नाव | :- | बाळासाहेब नारायण आवाड |
| माझे वय सुमारे | :- | ५० वर्षे |
| माझा व्यवसाय | :- | शेती |
| माझे राहण्याचे ठिकाण | :- | लांजेश्वर, ता.भूम, जि.उस्मानाबाद |

**०१.** घटना दिनांक १५.०२.२०१९ रोजी संध्याकाळी ३.३० ते ४.०० चे दरम्यान लांजेश्वर येथे शेतामध्ये घडली. मला माझा भाऊ भारत आवाड याचा फोन संध्याकाळी ६.०० वाजता आला की, भागवत गिते याने दीड ते दोन हजार फुट वायर हातरुन त्याचे स्पार्कींग होऊन त्यामध्ये दोन एकर ऊस, आंब्याचे झाड व पाच पी.व्ही.सी. पाईपचे नुकसान झाले व ४,००,०००/- ते ४,५०,०००/- रु. इतके नुकसान झाले. त्यानंतर मी घटनास्थळी गेलो असता तेथे जळून सगळे राख झाले होते. तेथे वायर होती व पोलवरील आकडा भागवत गिते हे काढत असताना वायरची स्पार्कींग होऊन वायर जळाले. त्यामुळे पोलीस स्टेशनला तक्रार दाखल केली. मला आता तक्रार दाखवली. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे व त्यावर माझी सही आहे. त्यास **निशानी १७** देण्यात येते. मी आरोपीला ओळखतो. तो आज न्यायालयात हजर आहे.

**सरतपास पूर्ण.**

**उलटतपास आरोपी तर्फे विधिज्ञ श्री. बी.डी.नागरगोजे–**

**०२.** हे म्हणणे खरे आहे की, घटनेच्या वेळेस मी तिथे प्रत्यक्ष हजर नव्हतो. घटना ही गट नं.१९५ मध्ये झाली. हे म्हणणे खरे आहे की, वायर अंथरण्याचे काम हे एम.एस.ई.बी. च्या लोकांचे असते. हे म्हणणे खरे आहे की, वायर लूज असल्यास स्पार्कींग होऊ शकते.

**०३.** हे म्हणणे खरे आहे की, आरोपी आर्मीमध्ये सरवीसला होते, त्यावेळेस त्यांची पत्नी शेती व घर सांभाळत होती. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी हे घरी नसल्याकारणाने आरोपीचे शेताचे बांधावर कॉंग्रेसचे गवत टाकणे यावरुन आरोपी व आमच्यामध्ये कुरबुरी होत होत्या. हे म्हणणे खरे आहे की, पोलीस स्टेशनला जी तक्रार दिली होती ती माझ्या सांगण्यावरुन दिली होती. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या सरतपासातील आकडा हा आमच्या शेतामध्ये टाकला आहे हे मी सांगीतले नाही.

**०४.** हे म्हणणे खरे नाही की, आग ही एम.एस.ई.बी.च्या चुकीमुळे लागली, आरोपी व आमच्यामध्ये सतत कुरबुरी होतात, त्या कारणावरुन मी आरोपीविरुध्द खोटी तक्रार केली. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीच्या चुकीमुळे आग लागली व त्यामुळे आरोपीचे देखील नुकसान झाले आहे. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासातील संपूर्ण मजकुर खोटा आहे.

**उलटतपास पूर्ण.**
**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत

MATE ASHLESHA SOUDAGAR
Digitally signed by MATE ASHLESHA SOUDAGAR
Date: 2025.08.01 17:12:11 +0530

दिनांक ०१.०८.२०२५

**( श्रीमती ए.एस.मते )**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, भूम.
(न्यायालय क्र.२)

<u>न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग भूम (न्यायालय क्र.२)</u>

नि.फौज.खटला क्र.१०४/२०१९
शासन वि. भागवत
**निशानी क्र.१८**

**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.०२ चा सरतपास सहा. सरकारी अभियोक्ता श्री.जे.जे.सरवदे यांचे मार्फत शपथेवर सुरु</u> –**

| | | |
|---|---|---|
| माझे नाव | :– | शरद राजेंद्र नलावडे |
| माझे वय सुमारे | :– | ३६ वर्षे |
| माझा व्यवसाय | :– | नोकरी |
| माझे राहण्याचे ठिकाण | :– | लांजेश्वर, ता.भूम, जि.उस्मानाबाद |

**०१.** दिनांक २१.०२.२०१९ रोजी पोलीस राऊत यांनी मला घटनास्थळी संध्याकाळी ६.०० वाजता बोलावले होते. माझेसोबत दुसरे पंच दिपक भोईटे व भारत आवाड हे होते. घटनास्थळावर जळालेला ऊस, झाडे, वायर, पाईप व शेतीचे सामान होते. तिथे पोलीसांनी पाहणी करुन आम्हाला सहया करण्यास सांगीतले. आता मला घटनास्थळ पंचनामा दाखवण्यात आला. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. त्यास **निशानी १९** देण्यात येते.

**सरतपास पूर्ण.**

**<u>उलटतपास आरोपी तर्फे विधिज्ञ श्री. बी.डी.नागरगोजे–</u>**

**०२.** मी वाशी येथे नोकरीस आहे. मी रोज वाशी येथे जाऊन–येऊन करतो. माझ्या नोकरीचा वेळ हा शिफ्टनुसार असतो. माझ्या गावापासून वाशीपर्यंतचे अंतर हे २५–३० किलोमीटर आहे. घटनास्थळाचा गट नंबर मला सांगता येणार नाही. घटनास्थळ व आमचे शेत याचेमध्ये ५०० मीटरचे अंतर आहे. घटनास्थळाचे दक्षीणेस आमचे गाव आहे, पूर्वेला जाधव यांची जमीन आहे.

**०३.** हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळ पंचनामा आमच्या समक्ष केला नाही व तो

आमच्या समक्ष लिहला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी सांगीतलेल्या चतुःसिमा व पंचनाम्यातील चतुःसिमा सारख्या नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, आज फिर्यादीच्या सांगण्यावरुन मी साक्ष देण्याकरीता आलेलो आहे. हे म्हणणे खरे नाही की, घटनेबाबत मला काही माहिती नाही. हे म्हणणे खरे नाही की, मला कसलीही माहिती नसताना मी पंचनाम्यावर सही केली. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**
**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत

MATE ASHLESHA SOUDAGAR
Digitally signed by MATE ASHLESHA SOUDAGAR
Date: 2025.08.01 17:12:18 +0530

दिनांक ०१.०८.२०२५

**( श्रीमती ए.एस.मते )**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, भूम.
(न्यायालय क्र.२)

<u>न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग भूम (न्यायालय क्र.२)</u>

नि.फौज.खटला क्र.१०४/२०१९
शासन वि. भागवत
**निशानी क्र.२०**

**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.०३ चा सरतपास सहा. सरकारी अभियोक्ता श्री.जे.जे.सरवदे यांचे मार्फत शपथेवर सुरु</u> –**

| | | |
|---|---|---|
| माझे नाव | :– | भारत नारायण आवाड |
| माझे वय सुमारे | :– | ३४ वर्षे |
| माझा व्यवसाय | :– | शेती |
| माझे राहण्याचे ठिकाण | :– | लांजेश्वर, ता.भूम, जि.उस्मानाबाद |

**०१.** घटना दिनांक १५.०२.२०१९ रोजी साधारणतः संध्याकाळी ४.०० चे दरम्यान आमचे शेतामध्ये घडली. तेथे भागवत गिते हे आकडा टाकताना ठिणग्या उडाल्या. त्यामुळे त्यांच्या ऊसाने पेट घेतला. त्यांच्या शेजारी आमचा ऊस होता. त्यामध्ये तोही जळाला. त्यामध्ये पाच आंब्याची झाडे, ४ इंचाचे पाच पाईप जळाले. त्यानंतर मी फिर्यादीला फोन केला. त्यानंतर ते उशीरा आले. तोपर्यंत पूर्ण ऊस जळून गेला होता. घटनास्थळी दैवशाला आवाड, सुनिता आवाड, शरद नलावडे इत्यादी होते. त्यामध्ये जवळपास ४,५०,०००/– रु. इतके नुकसान झाले होते. त्यानंतर पोलीस स्टेशनला जाऊन तक्रार दाखल केली.

**सरतपास पूर्ण.**

**<u>उलटतपास आरोपी तर्फे विधिज्ञ श्री. बी.डी.नागरगोजे–</u>**

**०२.** हे म्हणणे खरे आहे की, पोलीसांनी माझ्या सांगण्याप्रमाणे माझा जबाब घेतला होता. पोल हा आरोपी व आमच्या शेताचे बांधावर आहे. आरोपी यांच्या शेतात विहिर व बोर आहे. आरोपीने आकडा बोरकरीता टाकला होता. बोर ही पोलपासून साधारणतः २००० फुटाच्या अंतरावर आहे. पोलीसांचे व आमचे काही वाकडे नाही. माझ्या जबाबामध्ये पोलीसांना ५–६ आंब्याचे झाड जळाल्याचे सांगीतले होते. माझ्या जबाबामध्ये एक आंब्याचे

झाड जळाले असा मजकुर आहे. घटनास्थळावर दिपक कल्याण भोईटे हे होते. हे म्हणणे खरे आहे की, शेतकऱ्यांना विज पुरवणे व त्याची देखभाल करणे हे एम.एस.ई.बी. चे काम आहे. हे म्हणणे खरे आहे की, पोलच्या मध्ये व तारांच्या मध्ये अंतर असल्यास त्याची स्पार्कींग होण्याची शक्यता असते.

**०३.** हे म्हणणे खरे आहे की, आरोपी हे आर्मीमध्ये नोकरीस होते. हे म्हणणे खरे आहे की, त्यावेळेस आमचे व फिर्यादीचे एकत्र कुटुंब होते. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी नोकरीस असताना शेताची देखभाल ही त्यांची पत्नी करत होती. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी गावाकडे नसल्यामुळे त्यांच्या बांधावर गवत वगैरे टाकत होतो त्यामुळे त्यांच्यात व आमच्यात कुरबुरी होत्या. हे म्हणणे खरे नाही की, दोघांच्यामधील बांध फोडल्यामुळे आरोपी व आमच्यात कुरबुरी व्हायच्या. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासातील सर्व मजकुर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी भावाच्या सांगण्यावरुन आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत

MATE ASHLESHA SOUDAGAR
Digitally signed by MATE ASHLESHA SOUDAGAR
Date: 2025.08.01 17:12:27 +0530

दिनांक ०१.०८.२०२५

**( श्रीमती ए.एस.मते )**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, भूम.
(न्यायालय क्र.२)